Estd.1962
NAAC 'A++' Accredited by
NAAC (2021) with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

विषयः शैक्षणिक वर्ष 2022–23 मधील मार्च/एप्रिल, 2023 उन्हाळी सत्रातील पदवी स्तरावरील पारंपारिक अभ्यासक्रमाच्या परीक्षा **(प्रथम व द्वितीय वर्ष – सत्र 1, 2, 3 व 4)** महाविद्यालय स्तरावरील आयोजित करण्याबाबत.

मार्च/एप्रिल, 2023 उन्हाळी सत्रातील पदवी स्तरावरील सर्व पारंपारिक अभ्यासक्रमासाठी **(प्रथम व द्वितीय वर्ष – सत्र 1, 2, 3 व 4)** विहित प्रकियेद्वारे परीक्षा शुल्क भरलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा संबंधीत महाविद्यालय/मान्यताप्राप्त शिक्षण संस्था स्तरावर परीक्षेच्या आयोजनाबाबत विद्यापीठ अधिकार मंडळानी मान्यता दिलेली असून, पदवी स्तरावरील पारंपारिक अभ्यासक्रमाच्या **(प्रथम व द्वितीय वर्ष – सत्र 1, 2, 3 व 4)** विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे नियोजन करण्यासाठी पुढीलप्रमाणे महाविद्यालय स्तरावर कार्यवाही करण्यात यावी.

1. पदवी स्तरावरील पारंपारिक अभ्यासक्रमाच्या **(प्रथम व द्वितीय वर्ष – सत्र 1, 2, 3 व 4)** विद्यार्थ्यांच्या परीक्षा खालील कालावधीमध्ये महाविद्यालय/मान्यताप्राप्त शिक्षण संस्था स्तरावर प्रचलित ऑफलाईन स्वरूपात परीक्षा केंद्रावर प्रत्यक्ष हजर राहून घेण्यात याव्यात.

| अ.कं. | परीक्षा | प्रथम वर्ष (सत्र 1 व 2) | द्वितीय वर्ष (सत्र 3 व 4) |
|---|---|---|---|
| 1 | बी.ए., बी.बी.ए., बी.ए., (मल्टीमेडीया, डिफेन्स स्टडी व इतर) बी.व्होक. सर्व परीक्षा | दि.25.05.2023 ते दि.10.06.2023 | दि.01.06.2023 ते दि.20.06.2023 |
| 2 | बी.कॉम. बी.सी.ए., बी.कॉम (बिझनेस मॅनेजमेंट, बॅक मॅनेजमेट व इतर) | दि.25.05.2023 ते दि.10.06.2023 | दि.01.06.2023 ते दि.20.06.2023 |
| 3 | बी.एस्सी. बी.सी.ए. बी.एस्सी.(बायो–टेक., शुगरटेक, आय.टी., व इतर ) | दि.01.06.2023 ते दि. 20.06.2023 | दि.07.06.2023 ते दि. 25.06.2023 |

2. पदवी पारंपारिक **(प्रथम व द्वितीय वर्ष – सत्र 1, 2, 3 व 4)** अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे वेळापत्रक तयार करणे, वेळापत्रक प्रसिध्द करणे, प्रश्नपत्रिका तयार करणे, उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन व संपूर्ण परीक्षेचे नियोजन उपरोक्त कालावधीमध्ये करून सुरळीतपणे परीक्षा पार पाडण्याबाबतची कार्यवाही संबंधीत महाविद्यालय/मान्यताप्राप्त शिक्षण संस्था यांनी करणेची आहे.

3. ज्या विषयास विद्यार्थी परीक्षेस बसणार आहेत त्याच विषयाच्या प्रश्नपत्रिका महाविद्यालयातील शिक्षकाकडून तयार करून घेण्यात याव्यात. महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी त्यामधील एका प्रश्नपत्रिकेची निवड करून सदर प्रश्नपत्रिका परीक्षेपूर्वी विद्यार्थ्यांना देणेत यावी. सदर शिक्षकांना प्रश्नपत्रिका तयार करण्याबाबतचे पत्र संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक यांनी द्यावे.

4. सदर परीक्षेसाठी ज्या त्या अभ्यासमंडळाने निश्चित केलेल्या अभ्यासक्रमावर प्रश्नपत्रिका तयार करण्यात यावी. सदर अभ्यासक्रमासाठी अभ्यासमंडळे विभागाने विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली परिपत्रके/पत्रे अवलोकनी घ्यावीत. तसेच पेपर सेट करण्यासाठी संबंधीत शिक्षकांना मानधन हे सद्या पेपर सेटींगसाठी असलेल्या नियमानुसार राहील.

5. उपरोक्त परीक्षेचे वेळापत्रक तयार करतांना विद्यापीठामार्फत आयोजित करण्यात येणा–या परीक्षेचे वेळापत्रक अवलोकनी घेवून प्रथम व द्वितीय वर्ष परीक्षेचे वेळापत्रक तयार करण्यात यावे.

6. दूरशिक्षण केंद्राकडील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे नियोजन ज्या त्या महाविद्यालयातील प्राचार्य/ समन्वयक, दूरशिक्षण केंद्र यांनी करणेचे आहे. तसेच महाविद्यालयाच्या परीक्षा समितीमध्ये समन्वयक, स्टडी सेंटर यांचा समावेश करण्यात यावा व दूरशिक्षण केंद्राकडील सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षाबाबत काही शंका असल्यास मा. संचालक, दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे मागर्दशन घ्यावे.

7. दूरशिक्षण केंद्राकडील प्रवेशित विद्यार्थ्यांचा एखादा विषय महाविद्यालयात शिकविला जात नसल्यास नजिकच्या महाविद्यालयातील शिक्षकांच्याकडून त्या विषयाच्या प्रश्नपत्रिका गोपनीय पध्दतीने तयार करून घेवून परीक्षा घेण्यात याव्यात. तसेच प्रश्नपत्रिका तपासून प्राप्त गुण विद्यापीठाच्या संगणक प्रणालीत भरण्यात यावेत.

8. परीक्षा आयोजनाबाबतची अनुषंगिक तयारी करण्यात यावी. तसेच सदरबाबतची सूचना सर्व संबंधीतांना देणेत याव्यात.

9. सदर परीक्षेच्या मूल्यांकनाबाबत मध्यवर्ती मूल्यमापन विभाग यांचेकडून स्वतंत्रपणे सूचना कळविण्यात येतील.

10. दिव्यांग विद्यार्थ्यांना शासन निर्णयाप्रमाणे सोयी व सवलती देय राहतील. तसेच या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी 20 मिनिटे अधिकचा वेळ देय राहील. सदर विद्यार्थ्यांना प्राचार्य/संचालक यांच्या पूर्वपरवानगीने लेखनिक/ सहाय्यक घेता येईल.

11. सदर परीक्षेकामी होणारा खर्च महाविद्यालयाकडील प्रथम व द्वितीय वर्ष विद्यार्थ्यांच्या 75% परीक्षा शुल्कामधून विद्यापीठ नियमानुसार करण्यात यावा. ज्या महाविद्यालयांनी द्वितीय वर्षाचे परीक्षा शुल्क विद्यापीठ कार्यालयात जमा केले आहे अशा महाविद्यालयांनी 75% परीक्षा शुल्क मागणीबाबत ऑन परीक्षा विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा.

12. महाविद्यालय/अधिविभाग स्तरावर परीक्षा कर्तव्य पार पाडताना परीक्षेची गोपनीयता, पावित्र्यता जपणे आवश्यक आहे यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना अंमलात आणाव्यात व दक्षता घ्यावी.

13. सदर परीक्षेचे कार्यवलन/संचलन/पर्यवेक्षण/अंतर्गत भरारी पथक इत्यादी व परीक्षेच्या अनुषंगाने करावयाची संपूर्ण कार्यवाही संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक/समन्वयक यांचे मार्फत करणेची आहे.

14. वरील मार्गदर्शक तत्वे व सूचनांचे अवलोकन करून याबाबत आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर सेवक व विद्यार्थी यांना आपल्या स्तरावरून सत्वर सूचित करावे व विद्यापीठास सहकार्य करावे.

(डॉ. अजितसिंह जाधव)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ क्र. शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/215
दि. 12/05/2023
प्रत:

1. मा. प्राचार्य/संचालक, सर्व पारंपारिक महाविद्यालये यांना माहितीसाठी/योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी
2. सर्व उपकुलसचिव/सहा.कुलसचिव/समन्वयक– परीक्षा विभाग
3. संचालक, दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4. आयटी कक्ष – संबंधीत अभ्यासक्रमाच्या परीक्षेकरीता संगणक प्रणालीतून योग्य ती सुविधा उपलब्ध करून दयावी.
5. इंटरनेट विभाग – सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर ठेवण्यासाठी
6. परीक्षा विभागातील सर्व संबधित विभाग व अधिकारी – पुढील कार्यवाहीसाठी
7. पात्रता विभाग, पी.जी. प्रवेश विभाग – माहितीस्तव
8. जनसंपर्क अधिकारी कार्यालय – प्रसिध्दीकरीता